चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०८ मे., २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# वरोरा पोलीसांची कार्यवाही

## दोन आरोपीस ४ लक्ष १७ हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक ०७/०५/२०१९ रोजी वरोरा येथील पोलीस पथक पोस्टे वरोरा परिसरात पेट्रालिंग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, दोन इसम एका चारचाकी वाहनाने वणी मार्गे वरोरा येथे दारूची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून वणी बायपास रोडवर नाकेबंदी लावुन पोलीस पथकाने एका संशयीत चारचाकी वाहनाची झडती घेतली असता, वाहनामध्ये १० पेटया देशी दारू किं. १,००,०००/—रू, ०४ पेटया विदेशी दारू किं. ५७,६००/—रू, आणि एक चारचाकी वाहन क्र. एम.एच. २९ आर ४८८४ किं. २,५०,०००/—रू असा एकुण ४,१७,०००/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन वरोरा येथे नोंद करण्यात आला असुन दोन आरोपी नामे १)गोपाल येडोले, २)अतुल पावरकर दोन्ही रा. कारंजा लाड, जि. वाशीम यांना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात वरोरा पोस्टे प्रभारी पोनि. श्री. उमेश पाटील, यांचे नेतृत्वात पोहवा. सुरेश बांबोळे, पोना. दिपक दुधे, पोशि. निखील कौरासे यांनी पार पाडली.

---

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
०८ मे., २०१९
☎ : 07172-264300
📠: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# गोंडपिंपरी पोलीसांची कार्यवाही

## तिन आरोपीसह अनाधिकृतपणे साठवुन ठेवलेले बिटी बियाणी जप्त

दिनांक ०७/०५/२०१९ रोजी गोंडपिंपरी येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, मौजा नंदधर्वन येथे दोन इसमाच्या घरी अनाधिकृतपणे बिटी बियाणे साठवुन ठेवलेले आहे. अशा माहितीवरून गोंडपिंपरी पोलीस पथकाने नंदवर्धन येथे दोन वेगवेगळया घरी छापा टाकला असता आरोपी नामे १)संजय धुडसे यांचे घरी ३०० पॉकेट चोरबीटी बियाणे किं. २,४०,०००/—रू, आरोपी नामे २)संजय सांगडे यांचे घरी १७३ पॉकेट चोरबिटी बियाणे किं. १,३८,४००/—रू, असा एकुण **३,७८,४००/—रू** चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच सदर माल पुरविणारा आरोपी नामे ३) इंद्रपाल धुडसे, रा. नंदवर्धन धुडसे यांस सुध्दा अटक करण्यात आली आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन गोंडपिंपरी येथे अप.क्र. ६८/२०१९ कलम ४२०, ३४ भादंवि सहकलम बियाणे नियंत्रण आदेश १९८३ कलम ३(१), १८(१),२,१३ बियाणे अधिनियम १९६८ कलम ७,८,९,१०,११,१२,१३,३८, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ कलम ७,८,१५,१६ अन्वये दोन गुन्हे नोंद करण्यात आले आहे. सदर गुन्हयात तिन आरोपींना अटक करण्यात आली असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी राजुरा. श्री. शेखर देशमुख, यांचे यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन गोंडपिंपरी प्रभारी सपोनि. श्री. पि.डी. बोरकुटे, कृषी अधिकारी मंगेश पवार, आणि पोस्टे गोंडपिंपरी पोलीस कर्मचारी यांनी पार पाडली.

———————————————————————————————————————